आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, ५ जानेवारी २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ११ । पाने : ४ । मूल्य २ ₹



## 'मेड इन इंडिया' कोव्हॅक्सीन' २०० टक्के सुरक्षित

नवी दिल्ली : तिसरी फेज पूर्ण होण्याआधीच कोव्हॅक्सीन लसीला मान्यला दिल्यामुळे या लसीच्या क्षमतेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्यांना भारत बायोटेकचे व्यवस्थापकीय संचालक कृष्णा इल्ला यांनी चोख प्रत्युत्तर दिले आहे. लसीला आता राजकारणाचा विषय बनवला जात आहे. माझ्या कुटुंबातील एकही सदस्य कुठल्याही राजकीय पक्षाचा सदस्य नाही हे मी स्पष्ट करतो असे भारत बायोटेकचे एमडी कृष्णा इल्ला यांनी स्पष्ट केले. आमची कोव्हॅक्सीन लस २०० टक्के सुरक्षित आहे, याची मी तुम्हाला खात्री देतो, असे भारत बायोटेकचे एमडी म्हणाले.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी नाना पटोले की राजीव सातव?

## बाळासाहेब थोरात देणार राजीनामा



मुंबई : काँग्रेस पक्षात प्रदेशाध्यक्ष बदलाच्या हालचालींना वेग आला असून नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून विधानसभा सभापती नाना पटोले, राजीव सातव यांच्या नावाला हायकमांडने पसंती दिली असल्याचे विश्वसनीय सूत्रांनी 'वर्तमान'शी बोलताना सांगितले.

महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बदलण्याच्या हालचालींना वेग आला आहे. राज्याचे महसूल मंत्री आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची शक्यता आहे. थोरात सोमवारी राजधानी दिल्लीत असून पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेणार असल्याचं समजतं. प्रदेशाध्यक्षपदी कोण? काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी नाना पटोले, राजीव सातव, अमित देशमुख, यशोमती ठाकूर आणि विजय वडेट्टीवार यांची नावं चर्चेत असल्याचं समजतं. याबाबतचा निर्णय या महिन्यातच अपेक्षित आहे.

या सर्व नेत्यांच्या नावांमध्ये नाना पटोले, राजीव सातव यांची नाव आघाडीवर आहे. मंत्रिपद आणि काँग्रेस प्रदेशाध्यक्षपद एकाच व्यक्तीकडे नको अशी अनेक दिवसांपासून मागणी होती. दरम्यान, येत्या दोन दिवसांत याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. जून २०१९ मध्ये बाळासाहेब थोरातांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा पदभार स्विकारला होता.

सरकारमधील जबाबदारी आणि पक्षातील इतर जबाबदारी असल्याने आणि नवीन चेहऱ्याला संधी मिळावी म्हणून प्रदेशाध्यक्ष सोडण्याची इच्छा बाळासाहेब थोरातांनी व्यक्त केली आहे. थोरातांच्या नेतृत्वात काँग्रेसने मागील विधानसभा निवडणुकीत ४४ जागा जिंकल्या होत्या, त्यानंतर राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आणण्यातही त्यांची भूमिका निर्णायक होती, प्रदेशाध्यक्ष पद सोडण्याचा बाळासाहेब थोरात यांची भूमिका असली तरीही हायकमांड काय निर्णय घेतं हे महत्त्वाचं आहे. गत वर्षभरापासून पुर्णवेळ प्रदेशाध्यक्ष नसल्याने संघटनावरही परिणाम होत आहे.

# 'वर्तमान'च्या सकारात्मक वार्तांकनाचा सन्मान

## शिवसेनेच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे भगीरथ तोडकरी, बाबा देशमाने मानकरी

▶ प्रतिनिधी

ठाणे : कोरोना काळात सकारात्मक वार्तांकन करणाऱ्या वर्तमानच्या पत्रकारितेचा राज्यपातळीवर गौरव झाला. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने राज्य पातळीवरील कोरोना योद्धा सन्मानाचे वर्तमानचे मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने मानकरी ठरले. गुरूवारी कोपरी-ठाणे(पूर्व) मुंबई येथे झालेल्या एका सोहळ्यात महाराष्ट्रभरातून आलेल्या मान्यवरांच्या साक्षीने कोरोना योद्धा पुरस्काराचे वितरण झाले.

वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षेच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राज्याचे नगरविकास तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे, ठाणे शहराचे महापौर नरेश म्हस्के, माजी महापौर मिनाक्षी शिंदे, सभापती विलास जोशी, नगरसेवक राम रेपळे, रमाकांत मढवी यांची होती. याप्रसंगी बोलताना मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून व्यापक काम उभे राहीले आहे. कोरोना काळात गोरगरीब, गरजूंना श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाने आधार दिला. यापुढे संपूर्ण महाराष्ट्रभर वैद्यकीय मदत कक्षाचे काम सुरू होईल.

त्यासाठी कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे आणि त्यांची टीम मेहनत घेत आहे. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे म्हणाले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे काम ११ जिल्ह्यात सुरू झाले आहे. राज्याबाहेर केरळमध्येही आपत्कालीन परिस्थितीत कक्षाने मदत केली आहे. पत्रकार संतोष आंधळे म्हणाले, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षामार्फत आरोग्य चळवळ उभी राहत आहे. राजकारणी, लोकप्रतिनिधींनी आता आरोग्य क्षेत्रात गतीने काम करण्याची गरज आहे. आरोग्य क्षेत्रात योगदान देणारे डॉक्टर्स, समाजसेवक, पत्रकारांना कोविड योद्धा सन्मान प्रदान करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षेचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले होते.



मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना भगीरथ तोडकरी.

### आरोग्य क्षेत्रात मंगेश चिवटे आणि टीमचे योगदान उल्लेखनीय

शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची संकल्पना स्वप्नातील सत्यात उतरविणारे मंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी मंगेश चिवटे आणि टीमचे कौतुक केले. आरोग्य क्षेत्रात मंगेश चिवटे यांचे मोठे योगदान आहे. गरीब, गरजू रूग्णांच्या मदतीला हा कक्ष धावून जात आहे. कोरोना काळात कक्षाने केलेले काम उल्लेखनीय आहे, अशा शब्दांत मंत्री एकनाथ शिंदे यांनी गौरव केला.

## अपडेट



### नवा कोरोना : मुख्यमंत्री ठाकरे यांनी दक्षता घेण्याचे दिले निर्देश

मुंबई : ब्रिटन येथील नव्या कोरोना विषाणूमुळे राज्यात अधिक दक्षता घेतली जात असली तरी परदेशातून अन्य राज्यात उतरून तेथून महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या प्रवाशांचा ओघ लक्षात घेता अशा प्रवाशांना ते उतरतील त्या विमानतळांवरच क्वॉरंटाइन करण्याची मागणी केंद्र शासनाकडे करण्यात येणार आहे. सोमवारी वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोरोना लसीकरणाचा आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी यासंदर्भात मुख्य सचिवांना निर्देश दिले. ब्रिटनमधून परतलेल्या महाराष्ट्रातील ८ प्रवाशांमध्ये नवीन कोरोनाची लक्षणे आढळून आल्याच्या पार्श्वभूमीवर अधिक दक्षता घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यंत्रणांना दिले.



### 'महाराष्ट्रात कोरोनाच्या नव्या स्ट्रेनचे आठ रुग्ण'

मुंबई : ब्रिटनमध्ये आढळून आलेल्या कोरोनाच्या नव्या स्ट्रेनने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. आता महाराष्ट्रातही कोरोनाच्या नव्या स्ट्रेनचे आठ रुग्ण आढळून आले आहेत. राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी ट्विट करुन या बद्दल माहिती दिली आहे. त्यामध्ये मुंबईतील ५, पुणे, ठाणे आणि मीरा भाईंदर मधील प्रत्येकी एक जणांचा समावेश आहे. या सर्वांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग सुरू आहे. दरम्यान, देशात आजवर ३८ लोकांना कोरोनाच्या नव्या विषाणूचा संसर्ग झाला असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली.

### 'बर्ड फ्लू'चे मोठे संकट; ४ राज्यात अलर्ट जारी

दिल्ली : कोरोनाच्या संकटात आता बर्ड फ्लूचे नवे संकट उभे राहिले आहे. राजस्थान, मध्य प्रदेशनंतर आता हिमाचल प्रदेश, झारखंडमध्ये सतर्कतेचा इशारा दिला आहे. बर्ड फ्लू म्हणून ओळखला जाणारा हा रोग एव्हीयन इन्फ्लूएन्झा व्हायरस एच ५ एन१ मुळे होतो, ज्याच्या विळख्यात पक्षी आल्यानंतर त्यांचा मृत्यू होतो. हा जीवघेणा रोग असून बर्ड फ्लूचा कहर पाहून केंद्रासह राज्य सरकारनेही सतर्कतेचा इशारा दिला आहे. हिमाचलप्रदेशच्या प्रसिद्ध पोंग धरण परिसरात संशयास्पद स्थितीत १७०० स्थलांतरित पक्षांचा मृत्यू झाला आहे, ज्यामुळे अधिकाऱ्यांची चिंता वाढली आहे. मध्य प्रदेशच्या इंदूरमध्ये जवळपास ५० कावळ्यांना बर्ड फ्लूची लागण झाल्याची माहिती मिळाली आहे.

# मनूरमध्ये बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरालगत असलेल्या मनूर शिवारात शुक्रवारी सकाळी बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. मनूर शिवारात शेतात काम करणाऱ्या महिलांना सकाळी हा प्राणी दिसून आला. घाबरलेल्या महिलांनी तिथून पळ काढत घर गाठले. दरम्यान, वनविभागाला याबाबत माहिती देण्यात आली असून हा बिबट्या आहे कि अन्य कोणता प्राणी हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.



अंदाजे एक महिन्यापूर्वी तालुक्यातील सावरगाव शिवारात खराडे यांच्या शेताजवळ उसाच्या रानात एका पाणी देणाऱ्या शेतकऱ्याला बिबट्या आढळून आला होता परंतु वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तो बिबट्या नसून तडस असल्याचा अंदाज पायांच्या ठस्यावरून काढला होता परंतु त्या नंतर कुठेही बिबट्याचे दर्शन झाले नाही.

शुक्रवारी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान येथील मनूर शिवारात महिला मजूर शेतात काम करीत असताना त्यांना बिबट्यासदृश्य प्राणी दिसून आला. बिबट्या दिसल्याच्या भीतीपोटी या महिलांनी तात्काळ सामान फेकून पळतच घर जवळ केले.






# 'अनादर राउंड'ने सुरू होणार 'इफ्फी'चा सिलसिला

▶ विशेष प्रतिनिधी

पणजी : गोव्यात १६ ते २४ जानेवारी दरम्यान होणाऱ्या ५१ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा पडदा (इफ्फी) थॉमस विंटरबर्ग यांच्या 'अनादर राउंड' या चित्रपटाने उघडणार आहे. तर कियोशी कुरोसावा यांचा वाइफ ऑफ ए स्पाय' या जपानी चित्रपटाने महोत्सवाची सांगता होईल, अशी माहिती महोत्सवाच्या अधिकृत ट्विट संदेशावरुन मिळाली आहे.

'अनादर राउंड' हा डॅनिश व स्वीडिश भाषेतील चित्रपट असून तो १ तास ५७ मिनिटांचा आहे. हा चित्रपट डेन्मार्कची ऑस्करसाठी अधिकृत एन्ट्री होती. १६ जानेवारी रोजी इफ्फी मध्ये 'अनादर राउंड'चा इंडियन प्रिमियर होईल. तर 'वाइफ ऑफ ए स्पाय' या चित्रपटाचा इंडियन प्रिमियर २४ जानेवारी रोजी इफ्फीत होईल. 'इफ्फी'मध्ये ऑस्ट्रीया येथील संदिप कुमार यांचा 'मेहरुनिसा' या चित्रपटाचे देखील वर्ल्ड प्रिमियर होणार आहे. फारुख जाफर या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहेत. महिलेच्या आयुष्यभराच्या स्वप्नांना पंख देणारा हा चित्रपट आहे. दरम्यान, ५१व्या इफ्फी मध्ये विविध विभागातून एकूण २२४ चित्रपट पहायला मिळतील. यंदा कोरोना व्हायरसच्या पार्श्वभूमीवर महोत्सव हायब्रिड पध्दतीने होणार आहे. त्यामुळे सिनेप्रेमींना महोत्सवातील चित्रपट ऑनलाईन पहायला मिळतील.

# दर्जा, गुणवत्तेचे प्रतीक : आराध्या सुपर मार्केट

▶ प्रतिनिधी



संदेश दुगड

माजलगाव : जिल्ह्यातील पहिले सुपर मार्केट आणि मराठवाड्यातील पहिले आयएसओ मानांकन प्राप्त सुपर मार्केट म्हणून माजलगावच्या आराध्या सुपर मार्केटचा समावेश होतो. माजलगावकरांच्या सेवेत सन २०१५ पासून कार्यरत असलेल्या 'आराध्या'ने दर्जा, गुणवत्ता टिकवल्यानेच एवढा विश्वास संपादन केला असल्याचे वर्तमानशी बोलताना संचालक संदेश दुगड यांनी सांगितले.





माजलगावातील जूना मोंढा भागात चांडक कॉम्लेक्समध्ये आराध्या सुपर मार्केट ग्राहकांच्या सेवेसाठी उपलब्ध आहे. केवळ ग्राहकांचे हित लक्षात घेऊन आज 'आराध्या'ची प्रगतीकडे वाटचाल सुरू आहे. ग्राहकांना माफक दरात साहित्य विक्री करत असताना वेळोवेळी काही ठरावीक खरेदीवर मोठमोठ्या योजना सुरू केल्या. त्यांना ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आला. यात महिलांसाठी स्कुटी, थायलंड विदेशवारी, लक्की ड्रॉच्या माध्यमातून पैठणी साडी अशा विविध आकर्षक योजनांचा लाभ ग्राहकांना मिळाला आहे. किराणा सामान, जनरल सामान व इतर साहित्य खरेदीसाठी ग्राहक 'आराध्या'ला पसंती देतात. याचे कारण स्वच्छता, टापटीपपणा आहे, असेही संदेश दुगड म्हणाले.

ग्राहकांना विविध सेवा देताना माजलगाव शहरात नवीन बसस्थानकासमोर आणि जुना मोंढा या २ ठिकाणी एटीएमची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. दुगड ग्रुपच्या माध्यमातून विविध फर्म कार्यरत आहेत. 'आराध्या' सुपर मार्केट आयएसओ मानांकन प्राप्त आणि जिल्ह्यातील पहिले सुपर मार्केट असल्याचा दावा दुगड यांनी केला. ग्राहकांनी घरपोच सेवा मिळविण्यासाठी ९१५६८२८२८२, ८८५७९८८८८८ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन संदेश दुगड यांनी केले आहे.

### 'महिलांसाठी खरेदीचे भव्य दालन'

'आराध्या'बाबत ग्राहक डॉ.अर्चना मोरे म्हणतात, मी नियमित आराध्या सुपर मार्केटची ग्राहक आहे. माफक दरात येथे साहित्य मिळत असून ग्राहकाला यापेक्षा काय हवे असते. महिलांसाठी हे खरेदीचे भव्य दालन आहे. त्याचा इतर महिलांनीही लाभ घेतला पाहिजे, असे आवाहनही मोरे यांनी वर्तमानशी बोलताना केले.

## संपादकीय

### मानवी मूल्यांची व्हावी जतवणूक

सध्या कोरोना पार्श्वभूमीवर देश विविध आव्हानांना सामोरा जात असताना मानवी मूल्यांकडेही दुर्लक्ष केले जावू नये असे वाटते. यावर्षी कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर मानवाधिकार दिनाचा विषय आहे, पुन्हा चांगल्या मानवाधिकारांसाठी उभे राहा'. कोरोना महामारीनंतर मानवाधिकाराची पायमल्ली होण्याच्या घटना देशभरात मोठ्या प्रमाणात घडल्या आहोत. या पार्श्वभूमीवर यंदाचा मानवाधिकार दिनाचा संदेश एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता तो कायमस्वरुपी आपलासा करावा लागणार आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिन जगभरात दरवर्षी १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. १० डिसेंबर १९४८ रोजी प्रथमच संयुक्त राष्ट्राने मानवी हक्क स्वीकारण्याची घोषणा केली. परंतु अधिकृत घोषणा सन १९५० मध्ये करण्यात आली. यावर्षी कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर मानवाधिकार दिनाचा विषय आहे, पुन्हा चांगल्या मानवाधिकारांसाठी उभे राहा'. यानिमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस म्हणाले आहेत की, कोरोना साथीचा सामना करण्यासाठी, लिंग समानता, लोकसहभाग, हवामान न्याय आणि शाश्वत विकास–मानवी हक्कांना केंद्रीय महत्व देणे आवश्यक आहे. कोरोना महामारीनंतर मानवाधिकाराची पायमल्ली होण्याच्या घटना देशभरात मोठ्या प्रमाणात घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर यंदाचा मानविधिकार दिनाचा संदेश एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता तो कायमस्वरुपी आपलासा करावा लागणार आहे. आपल्यालाही जगण्याचा हक्क आहे, याबाबतची जाणीव झाल्यानेच मागील काही वर्षात मानवाधिकार आयोगाकडे संपूर्ण देशभरातून लाखापेक्षा अधिक तक्रारी मानवाधिकार आयोगाकडे दाखल झाल्याच्या नोंदी नुकत्याच समोर आल्या आहेत. यातली एक स्वागतार्ह बाजू म्हणजे सामान्यजन, महिला, अशिक्षित आणि मागास दलितांमध्येही आपल्या अधिकारांबाबतची सजगता आली आहे. ते आता आपल्या स्वत:करिता संघर्ष करू लागले आहेत. आहे रे' आणि नाही रे' या दोन गटांतला हा केवळ वर्चस्वाचा नाही, तर अस्तित्वाचा संघर्ष बनू पाहत आहे. दुसरी बाजू अत्यंत खेदजनक आहे. ती म्हणजे आपण एकीकडे मंगळावर जाण्याच्या, डिजिटल स्कूलच्या, आयटी पार्क अन् स्मार्ट सिटीच्या घोषणा करतो, तर दुसरीकडे अनेक घटकांना आपण माणूस म्हणूनही स्वीकारत नाही, हे विदारक सत्य आहे. राज्यघटनेने प्रत्येक भारतीय नागरिकास व्यक्ती स्वातंत्र्य देतानाच माणूस म्हणून जगण्याचे किमान हक्क आणि अधिकार प्रदान केले आहेत. कोणत्याही व्यक्तिला जात आणि लिंग या कारणाने भेदाभेदीला सामोरे जावे लागणार नाही, याचे संरक्षण खुद्द राज्यघटनेने दिले आहे. ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, घटनाकारांनी भारतीय राज्यघटनेत इतर मूलभूत हक्कांसोबत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्काचाही समावेश केला. स्वातंत्र्यानंतर जवळपास ४८ वर्षानी १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने प्रत्येक राज्यातही मानवाधिकार आयुक्तांची नेमणूक करून या संदर्भातील केसेस चालवल्या जातात. यात महिला आणि बालकांच्या संरक्षणाचा विशेष विचार केला जातो. राष्ट्रीय मानवाधिकाराच्या १२ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या वर्धापनदिनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०१५ ते सप्टेंबर २०१६ पर्यत १ लाख ५ हजार ६६४ तक्रारी मानवाधिकार आयुक्तांकडे दाखल झालेल्या आहेत. विशेष म्हणजे या तक्रारींमधील सर्वाधिक तक्रारी या प्रशासकीय, राजपत्रित अधिकारी, पोलीस, जेल प्रशासन यांच्या विरोधातल्या आहेत. यामध्ये सुमोटो केसेसची संख्या केवळ १३३ आहे. आयोगाकडे २०१४ मध्ये १ लाख १७ हजार ४७७, तर २०१५ मध्ये १ लाख ६ हजार ६८४ केसेस दाखल झाल्या होत्या. यातल्या अनेक केसेस मानवाधिकाराशी संबधित नसतानाही त्यांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न आयोगाने केला आहे. मालमत्ता वा इतर व्यक्तिगत केसेस त्या–त्या विभागाकडे वर्ग केल्या आहेत. अनेक खात्यांनी दखल न घेतल्याने तक्रारदारांनी थेट मानवाधिकार आयोगाकडेच आपली गाऱ्हाणी मांडली आहेत. सप्टेंबर २०१६ पर्यत दाखल झालेल्या तक्रारींपैकी ५९ हजार ९२४ तक्रारींचा निपटारा आयोगाने केल्याचा दावा करण्यात आला आहे. या केसेसपैकी ३८० केसेसमध्ये नुकसान भरपाईपोटी ७० लाख ९३ हजार रुपयांसह दंड ठोठावण्यात आला आहे, तर ४१० केसेसमध्ये ११ कोटी ५९ लाख ५८ हजार १७२ इतक्या रकमेची नुकसानभरपाई तक्रारदारांना अथवा त्यांच्या वारसांना देण्यात आली आहे. या कालावधीत ३२ हजार ४९८ केसेस या पोलीस खात्याच्या विरोधात आढळल्या आहेत. न्यायालयीन आणि पोलीस कोठडीत असताना संशयास्पद मृत्यू झाल्याच्या सर्वाधिक केसेस उत्तर प्रदेशमध्ये आढळल्या आहेत. मानवाधिकार आयोगाकडून वेळोवेळी विविध केसेसच्या माध्यमातून केंद्र सरकारला सुशासन देण्याबाबतच्या आपल्या वचनाचे काय याबाबतची विचारणा केली आहे. आपल्या आसपास कोणाच्याही मानवी हक्कांवर गदा येते, असे लक्षात आले तर संबंधितांचे नाव, पत्ता आणि समस्या याबाबत सुजाण नागरिक एका पत्राद्वारेही थेट मानवाधिकार आयोगाकडे तक्रार नोंदवू शकतात. आयोगाने दाखल केलेल्या आकडेवारीवरून हे लक्षात येते की, देशातल्या बहुतांश राज्यात आजही मानवी हक्कांची पायमल्ली मोठ्या प्रमाणात होत आहे. सध्या सगळीकडे मोर्चा, आरक्षण आदी विषयांमुळे वातावरण तापलेले आहे. सगळेजण एकाचवेळी बोलू पाहात आहेत आणि ज्याच्याशी बोलू इच्छितात, तो सरकार नावाचा घटक आपल्यातच मग्न आहे. मागण्या काय अन् पुरवठा काय याचा कुठेही संबंध राहिलेला नाही. एकंदरच आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय', अशी सर्वसामान्यांची अवस्था आहे. बरं अशी ही अवस्था आत्ताच आली आहे का? तर, अजिबात नाही. स्वातंत्र्यानंतर सत्ताधाऱ्यांनी आपापल्या घरी धनराशी वाढविण्यापलिकडे आणि अधिकाधिक काळ सत्ता घरातच कशी राहील या साठमारीपलिकडे कुणी काहीच केले नाही, हे वास्तव आहे. सत्ताधिशांच्या या स्वार्थी राजकारणात ज्येष्ठ साहित्यिक रविंद्रनाथ टागोरांच्या काव्यपंक्तीतला टागोरांना अपेक्षित असणारा, फिअरलेस माईंड कसा शोधायचा, हाच खरा प्रश्न उद्भवत आहे. कोरोना व्हायरसने प्रत्येकाला आत्मपरीक्षण करायला लावले आहे. येणारा काळ अधिक आव्हानात्मक असला तरी घाबरून न जाता सर्तकता बाळगणे गरजेचे आहे.

# भेदाभेदांच्या पलीकडचं,स्वागत नव्या वर्षाचं

**धर्मवेडे काहीही सांगत असतील, तरी थर्टी फर्स्ट आणि न्यू इयर हे आता एका धर्माचे उरलेले नाहीत. ते लोकोत्सव बनलेत. आपल्या गटारीसारखे. ते धर्माशी नसून कालगणनेशी संबंधित आहेत. गटारी हे श्रावण महिन्याच्या निग्रहाआधी इंद्रियांना दिलेलं रिलॅक्सेशन. तसंच पंचांग ते कॅलेंडर या स्थित्यंतरातलं एक सेलिब्रेशन आहे आपलं न्यू इयर.**



**गेस्ट कॉलम**

**सचिन परब**

वर्ष येतं जातं. भिंतीवरचं कॅलेंडर बदलतं. आपलं आयुष्य तसंच सुरू राहतं. आयुष्य तेच आहे अन् हाच पेच आहे. तरीही तो पेच न सोडवता अख्खं जग न्यू इयर साजरं करतं. थर्टी फर्स्ट, न्यू इयर हे नव्या जगाचे उत्सव आहेत. जवळपास सगळ्या देशात ते साजरे होतात. सर्व धर्माचे लोक ते साजरे करतात. भाषा, रंग, कूळ, जात, प्रदेश असे सगळे माणसामाणसातले बांध एका कालगणनेने तोडलेत. या ओळखींपेक्षा, अस्मितांपेक्षाही प्रत्येकासाठी आपलं जगणं महत्त्वाचं असतं. आपण जगणं सोप्या करणाऱ्या गोष्टी स्वीकारत असतो. तेव्हा आपण अस्मिता बाजूला ठेवतो. म्हणूनच बारा भानगडी असलेल्या आपापल्या जुन्या कॅलेंडरांना म्हणजेच पंचांगांना आपण असंच सोडून दिलं. त्याच्याशी आपल्या धर्माचे, संस्कृतीचे, परंपरांचे, रितीरिवाजांचे अनेक अभिमान जोडलेले होते. तरीही जुनी पंचांगं सोडून दिली. फक्त हिंदूंच नाही, सगळ्या धर्मात तसं झालंय. कारण आपण आता वापरत असलेलं १ जानेवारीला सुरु होणारं ग्रॅगेरियन कॅलेंडर सोपं आहे. खरं तर आपल्यासाठी हे इसवी सन. इसवी म्हणजे इसाचं. इसा म्हणजे येशू. येशू ख्रिस्त. आज जितकं वर्ष आहे, तितक्या वर्षापूर्वीपासून ही कालगणना मोजली जाते. म्हणजे हे २०१९ वर्ष आहे, तर तितक्या वर्षापूर्वी गोठ्यात जन्मलेलं येशूबाळ चार वर्षाचा असेल. या कालगणनेमुळे आता जगभर ख्रिस्तपूर्व आणि ख्रिस्तानंतर अशी काळाची विभागणीच झालीय. कसंबसं ३५ वर्षाचं आयुष्य मिळालेला हा गरिबांमधेच राहणारा दलित पीडितांचा मसिहा साधंसं आयुष्य जगला. त्याच्या अपरंपार करुणेने त्याला अद्भूततेचं वलय मिळालं. येशूने धर्म सोपा करून टाकला. येशूने गरीबांचं अवघडलेलं जगणंच सोपं करून टाकलं. त्यामुळे काळावर प्रभाव टाकणारा त्यांच्यासारखा दुसरा माणूस नाही झाला दुसरा. काळ त्याच्या नावाने ओळखला जाऊ लागला.

येशूने ना धर्म स्थापन केला. ना कोणता वर्गलढा उभारला. ना जातीचं संघटन केलं. त्याने हे इसवी सनाचं कॅलेंडरही सुरू केलं नाही. संघटित धर्माची गरज म्हणून सोळाव्या शतकात कुठल्याशा पोपने ते सुरू केलं. खरंतर रोमन वगैरे काळापासून त्याच्या आधीच्या आवृत्त्या होत्याच. ते ख्रिस्ती धर्माने स्वीकारलं . हवं तसं साफसूफ केलं. पोपच्या धर्माला येशूचं नाव होतं. त्यामुळे पोपचा धर्मही पसरत गेला. पोपच्या या कॅलेंडरलाही नाव येशूचं होतं. त्यामुळे ते अधिक पसरत गेलं.

येशूच्या नावाने साम्राज्य पसरवून युरोपातल्या देशांनी जगभर वसाहती केल्या. तेव्हा येशूच्या नावाचं कॅलेंडर अधिक पसरत गेलं. पोप धर्माच्या साम्राज्याचं प्रतीक बनला. पण येशू धर्माच्या भिंती ओलांडून माणसाच्या मनामनात पसरत होता. महात्मा फुलेंसाठी तो दुसरा बळीराजा ठरावा, इतका खोलवर पाझरत गेला. १ जानेवारी हे खरं तर ख्रिश्चनांचं नवं वर्ष. ख्रिश्चन हा जगातला सगळ्यात मोठा धर्म. धर्म कोणताही असो. निराधाराला आधार देण्यासाठी त्याची निर्मिती झालीही असेल. पण आज सगळेच धर्म दुकानं झालेत. मोठमोठे शॉपिंग मॉल बनलेत. ख्रिश्चन धर्म तर जगभर पसरलेली सगळ्यात मोठी बाजारपेठ. त्याचा सगळ्यात मोठा सण नाताळाचा. ख्रिस्तजयंतीपासून बारा दिवस चालणारा. त्यात थर्टी फर्स्टही आलं आणि न्यू इयरही. त्याचा बाजार होणार होताच. बाजारात सण विकायचा होता. बाजाराने या सणाला जगभर विकलं.

त्यामुळे हा सण आता कुणाचाच उरला नाही. ना येशूचा उरला, ना येशूच्या अनुयायांचा. पोपच्या साम्राज्याच्या हातूनही तो निसटून गेलाय कधीचाच. येशूला न मानणारेही नाताळ साजरा करतात. देवाला न मानणारेही हा सण साजरा करतात. कारण प्रतीकांत अडकवून या सणाला सोपं केलंय. येशूला ख्रिश्चन बनवण्यात पोपच्या धर्माला यश मिळालेलं असलं तरीही सांताक्लॉज धर्माच्या तावडीतून सटकलाय. जगातल्या सगळ्या धर्मांच्या पोरांटोरांनी त्याला कधीचाच सेक्युलर बनवलाय. भटक्या विमुक्तांची पोरं मुंबईच्या सिग्नलवर सांताक्लॉजच्या टोप्या विकत फिरतात. त्या टोप्या घालून टिनपाट हॉटेलांतली झारखंड आणि ओरिसाहून आलेले वेटरही चायनीज वाढतात.थर्टी फर्स्ट आणि न्यू इयर हे लोकोत्सव तर त्याआधीच सगळ्या धर्मांचे झालेत. ते मुळात आहेतच तसे. आपल्या गटारीसारखे. कारण गटारीही कालगणनेशी संबंधित. श्रावण महिन्याच्या निग्रहाआधी इंद्रियांना दिलेलं रिलॅक्सेशन. तसंच पंचांग सोडून कॅलेंडरपर्यंत येताना थर्टी फर्स्ट आणि न्यू इयर आपलं बोट धरून आपसूक आलेत. गेल्या चारपाचशे वर्षात थर्टी फर्स्ट देणारं ग्रॅगेरियन कॅलेंडर बदलत गेलंय. नवनव्या प्रदेशांना स्वीकारताना त्यातली गुंतागुंत गळून गेलीय. त्याचे जुने संदर्भ बदलत गेलेत. ते व्यापक झालं म्हणून सोपं झालं की सोपं झालं म्हणून व्यापक झालं. बहुधा दोन्ही होत गेलं.

आपलं जगणं सोपं करतं, ते आपण स्वीकारतो. आता आपण नवनवी टेक्नॉलॉजी स्वीकारतोय. त्यासोबत येणारे बदलही. त्याच्याही मुळाशी सोपेपणाच आहे. माणसाला सोप्याची ओढ आहे. जगाचं शोषण करणारे दुकानदार आपापल्या सोयीनुसार जगाला अवघड बनवतात. मग कुणीतरी वेडे पुन्हा ते सोपं बनवण्याचे रस्ते शोधून काढतात. दुकानदार त्या वेड्यांच्या रस्त्यांना अवघड करून त्याचीही नवी दुकानं बनवतात. पुन्हा ते सोपं करण्याचे लढे उभारले जातात. सोप्या अवघडाच्या संघर्षात आपला प्रवास अधिक समृद्ध म्हणजेच सोपा होत जातो. आपल्या सगळ्यांचं जगणंही असाच संघर्ष असतो. आपल्या सगळ्यांचंही जगणं मुळात सोपंच आहे. दुकानदारांनी ते कठीण करायचा चंगच बांधलाय. जातधर्मांची दुकानं मांडलीत. जातधर्मामुळे आपलं जगणं सोपं झाल्याचं आपल्याला त्यांनी पटवून दिलंय. आपल्यालाही ते खरं वाटतंय. पण तसं नाहीय. खरं सोपं जगणं त्या भेदांच्या पलीकडचं आहे. जगातली सगळी तत्त्वज्ञानं हीच सोपी गोष्ट सांगत आहेत. हजारो वर्ष सांगत आहेत. बोधिवृक्षाखाली भगवान बुद्धांना मिळालेल्या ज्ञानाची दीक्षाही तीच आहे. दोन्ही बाहू वर करून व्यासही तेच ओरडून सांगत आहेत. क्रूसावर अडकवलेले येशूही तेच सांगत आहेत. प्रेषित मोहंमदांना झालेला साक्षात्कारही तेच सांगतो आहे. पतंजली, थिरुवल्लुवर, बसवेश्वर, नामदेव, ज्ञानेश्वर, कबीर, नानक, मीरा, तुकाराम सारे सारे हेच सांगत आहेत.

अवघडाचं आवरण नाही, तर त्यातून सोप्याकडे झेपावण्याची माणसाची ओढ खरी आहे. पण अवघडलेपणाचा आणि तुटलेपणाचा पिंजरा सोन्याचा आहे. तो पिंजरा मोडून सोप्याच्या दिशेने जाण्याची ताकद आपल्याला आपल्या सगळ्यांच्या पंखांमध्ये भरता येवो, याच नव्या वर्षाच्या शुभेच्छा. कारण प्रकाशाकडे झेपावणारा हा एकादुकट्याचा प्रवास नाही. तो पाखरांच्या थव्यांचा प्रवास आहे. आपल्या सगळ्यांना त्या थव्यातूनच उडायचं आहे. चला नव्या वर्षात प्रकाशाकडे जाऊया.

# २०२१ : काल, आज आणि उद्या

**एखाद्या भितीदायक स्वप्नाप्रमाणे २०२० हे वर्ष पार पडलं. आता या वर्षाच्या शेवटाकडे आपण आलोय. नवं वर्ष कोरोनाला संपवेल, असे अंदाज बांधले जातायत. पण हे वर्ष फक्त कोरोनाच नाही तर राजकारण आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही नवी नांदी घेऊन येऊ शकतं. त्यामुळे सरत्या वर्षीच्या जखमांवर मलम लावलं जाईल.येणाऱ्या वर्षात अर्थव्यवस्था जशी सुधारेल आणि रुळावर येईल त्याप्रमाणे या परिस्थितीत सुधारणा होईल पण गाडी पूर्णपणे रुळावर यायला अजून वेळ लागणार हे क्रमप्राप्तच आहे. सर्व थरातल्या नोकऱ्यांनी निच्चांक गाठल्यामुळे येणारं वर्ष हे खर्चाचं कमी आणि पैसे जमा करण्याचंच जास्त असणार आहे.**




**विशेष**

**केतन वैद्य**

माझा हा तर्क तसा आहे, पाश्चात्य आणि पुर्वेतल्या तत्त्वज्ञानावर आधारलेला. पण हा आपल्या काळ' या संकल्पनेला लागू होतो. काळ किंवा वेळ या दोन्ही गोष्टी सर्वसाधारणपणे भुतकाळ आणि भविष्यकाळाशी जोडल्या जातात. वर्तमान आणि भविष्याशीही त्यांचा बऱ्याचदा संबंध असतो. जागतिक संदर्भ आणि प्रतिस्पर्धावाद आता पुर्वेत आणि पश्चिमेत दोन्ही ठिकाणी रूढ झाला आहे. पण पश्चिमेत काल आणि उद्याला वेगवेगळ्या भाषेत वेगळे शब्द आहेत.

गुजराती किंवा अगदी हिंदीसारख्या भारतीय भाषांमधे काल आणि उद्याला एकच शब्द आहे – कल.' अनेक भारतीयांसाठी काळ हा स्थिर झालाय. प्रतिस्पर्धावादात तो कायम तुलनेत फसलेला असतो. चांगली वेळ आणि वाईट वेळ, चांगला काळ आणि वाईट काळ हे सगळे कालचे आणि उद्याचे संदर्भ असतात. पण मुळात भारतीयांच्या नेणिवेत काळ हा सतत चालत असूनही कुठेतरी स्थिरावलेला आणि थांबलेला असाच आहे.

वास्तवाशी सुसंगत नसलेला आशावाद

हे गृहितक मांडणं एवढ्याकरता आवश्यक होतं की कोरोनाच्या संकटामुळे काळ प्रतिस्पर्धीवादी आणि काळाबरोबर न बदलण्याचा एक अलिखित समझोता करून घेतलेले अशा दोघांसाठीही थांबला होता. जणू जगाने आपल्या समस्त चांगल्या वाईट अनुभवासकट एक पॉझ घेतलाय. असाच पॉज भारतानेसुद्धा घेतला होता. कोरोना कमी झाला असला तरी मागच्या वर्षीचं सावट हे याही वर्षी आपल्या सगळ्याभोवती कायम राहील हे नक्की. या मुळेच भविष्याबद्दलचे कुठलेही ठोकताळे मांडताना नवीन वर्ष हे गेल्या वर्षीपेक्षा अधिक सुसह्य असेल हा आशावाद चांगला असला तरी खेदानं सांगावसं वाटतं की तो वास्तवाशी सुसंगत असलेच असं नाही. मागच्या एका वर्षात अनेक जाणत्या अर्थतज्ञांनी मांडल्याप्रमाणे भारतीयांचा पैसे बचतीचा दर हा अत्यंत रोडावला आहे. याचे दोन अर्थ होतात. भारतीय पहिल्यापेक्षा अधिक वस्तू विकत घेत आहेत. दुसरा अर्थ असा ही होतो की वाढत्या बेरोजगारीमुळे साठवलेले पैसे जास्त खर्च करायची नामुष्की त्यांच्यावर आली आहे. औद्योगिक उत्पादन क्षमता असू दे, सेवा क्षेत्र असू दे, वाहन उद्योग असू दे, रोडावलेली मागणी आणि विक्री या दोन्हीचा परिणाम होताना दिसतो आहे.

एडुटेकचं मोठं क्षेत्रं

येणाऱ्या वर्षात अर्थव्यवस्था जशी सुधारेल आणि रुळावर येईल त्याप्रमाणे या परिस्थितीत सुधारणा होईल पण गाडी पूर्णपणे रुळावर यायला अजून वेळ लागणार हे क्रमप्राप्तच आहे. सर्व थरातल्या नोकऱ्यांनी निच्चांक गाठल्यामुळे येणारं वर्ष हे खर्चाचं कमी आणि पैसे जमा करण्याचंच जास्त असणार आहे. तंत्रज्ञानाबद्दल तितके उत्सुक नसणारे आपण शाळेपासून ते ऑफिसपर्यत सगळं काम करण्याकरता तंत्रज्ञानचा वापर दिवस–रात्र करू लागलो आहोत. तंत्रज्ञानाचा आपल्या आयुष्यातला शिरकाव इतका लवकर संपेल असं वाटत नाही. पुढे जाऊन हे ही सांगेन की कार्यालयं आणि कामासाठी प्रवास हे हळूहळू कालबाह्य व्हायला लागेल. एडुटेकचं एक मोठं क्षेत्र उघडताना येणाऱ्या वर्षात दिसेल.

राजकारणाचं भवितव्य

सामाजिक आणि राजकीय गोष्टींचा उहापोह करायचा झाला तर हे या दोन संकल्पनांना जोडणारं हे वर्ष असेल. हा लेख लिहीत असेपर्यत तरी शेतऱ्यांनी केलेल्या महाआंदोलनावर कोणताच तोडगा सरकारकडून निघाला नाही आणि म्हणून शेतकऱ्यांचा संप निवळण्याचं काही चिन्हही दिसत नाही. सरकार दरबारी असणाऱ्या पक्षाने त्यांना बदनाम करायचे आणि बुद्धिभेद करायचे अनेक प्रयत्न केले. पण आत्तापर्यत ते सपशेल फसलेत. शीख समाजाने जगभर कमावलेल्या पाठिंब्यामुळे सोडलं तरी पळत नाही आणि न धरताही चावतंय अशी काही अवस्था केंद्र सरकारची झाली आहे. २०२१ ला आसाम, केरळ, पॉंडिचेरी, तमिळनाडू आणि पश्चिम बंगाल अशा महत्त्वाच्या निवडणुका येऊ घातल्यात. यापैकी सीएए पास केल्यानंतर आसाममधे सत्ता टिकवण्यासाठी भाजपला मोठा संघर्ष करावा लागणार आहे. तमिळनाडूत एड्डीपाडी पलनीस्वामीचं सरकार टिकवणं भाजपसाठी गरजेचं आहे. पण पश्चिम बंगालमधे ममता बॅनर्जी यांना भाजप हरवू शकली तर देशाच्या राजकारणाला खरी कलाटणी मिळेल.

दिल्लीतल्या सुत्रांप्रमाणे डावे, कॉंग्रेस आणि तृणमुलमधे युती करायचे प्रयत्न चालू आहेत. हे झालं नाही तर विखुरलेल्या विरोधकांसमोर भाजप तगडं आव्हान सादर करू शकतो. पण प्रस्तुत परिस्थितीत खरी कसोटी आहे ती लोकांची मनं जिंकण्याची. बहुमत जिंकूनही भाजप हे करू शकली नाही.

बदलाचं चैतन्य सळसळणार?

सीएएवर आगडोंब उसळलाय. कलम ३७० च्या मुद्द्यावर गुपकर युतीला आघाडी मिळालीय. शेतकरी कायद्याविरोधात जागोजागी निदर्शनं चालू आहेत. देश हा काही एककल्ली संबोधन ऐकून घेणारी कोणती शाखा नाही. इथं प्रश्न विचारले जाणार आणि त्याची उत्तरं द्यावी लागणार. इतकंच नाही इथं कायदे बनवताना निवडणुकीतल्या बहुमताकडे नाही तर ताज्या जनमताकडे पहावं लागणार. नाहीतर आजची विचित्र परिस्थितीत २०२१ ला वारंवार पहायला मिळेल. निवडणूक जिंकायला एक चांगली यंत्रणा आणि आर्थिक बळ कामाला येऊ शकतं. पण देशाची मनं जिंकण्याकरता जनमानसाची नस जाणावी लागते. २०२० च्या जखमांवर मलम २०२१ नक्की लावेल. पण त्यासाठी शासनप्रणालीला अधिक लोकाभिमुख व्हावं लागेल. आपल्या संस्कृतीत वेळ ही जड असली तरी त्यात बदलाचं चैतन्य सळसळायला वेळ लागणार नाही.

# दि मराठवाडा अर्बनचे हायटेक पाऊल

## फिरते एटीएम कार्यान्वित; मराठवाड्यातील पहिला प्रयोग

▶ प्रतिनिधी

माजलगाव : दि मराठवाडा अर्बनने हायटेक पाऊल उचलले असून मराठवाडा विभागातील पहिले फिरते एटीएम सुरू करण्याचा मान मिळविला आहे. फिरत्या एटीएममुळे ग्राहकांची गैरसोय टाळली जाईल असा विश्वास दि मराठवाडा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सतिष सावंत यांनी वर्तमानशी बोलताना व्यक्त केला आहे.

माजलगाव शहरातील दि मराठवाडा अर्बनने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहरासह तालुक्यातील सभासद, खातेदार व ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचे गौरवोद्गार दि मराठवाडा आर्बनच्या मराठवाड्यातील

पहिल्या फिरत्या एटीएमच्या उदघाटन प्रसंगी बोलताना आमदार प्रकाश सोळंके यांनी सांगितले. दि मराठवाडा अर्बनच्या वतीने जानेवारी रविवारी सकाळी १०:३० वाजता मराठवाड्यातील पहिल्या फिरत्या ए.टी.एम.चे उदघाटन आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी नगराध्यक्ष शेख मंजूर, तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, सभापती संभाजी शेजुळ, अॅड. भानुदास डक, भागवताचार्य ह.भप.अंकिता दिदी माने, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे, नासेर खाँ पठाण, नगरसेवक सुशांत पौळ, नगरसेवक सय्यद राज अहमद, कचरु खळगे, भाई अॅड.नारायण गोले पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक दि मराठवाडा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सतिष सावंत यांनी केले. सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले,





**माजलगाव : मराठवाड्यातील पहिल्या फिरत्या एटीएमच्या उद्घाटनाप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके, नगराध्यक्ष शेख मंजूर, तुळजाभवानी अर्बनचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, अॅड.भानुदास डक, अॅड.नारायण गोले पाटील, भागवताचार्य ह.भप.अंकिता दिदी माने, ह.भ.प.शिवाजी महाराज गडदे आदी.**

तर आभार माजलगाव तालुका सहकारी पतसंस्था फेडरेनचे सचिव संजय सपाटे यांनी मानले. कार्याक्रम यशस्वी करण्यासाठी दि मराठवाडा आर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन ढासाळकर, अमोल आंधारे, सौ.सिमा टाक, सौ.सुरेखा बाभुळगावकर, शरद शेजुळ, सचिन दळवी, विनायक तौर, नागेश थावरे यांनी परिश्रम घेतले.



## ‘जवाहर’मध्ये महिला शिक्षण दिन साजरा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात तीन जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने महिला शिक्षण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका माधुरी कुलकर्णी ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शक शुभांगी कुलकर्णी,जमिला शेख, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक किशोर मोताळे, मोरेश्वर मसलेकर, गौतम पोटभरे, संजीवनी चांदमारे, गायत्री खोडवे, सुनिता भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. सावित्रीमाईंच्या प्रतिमापूजनानंतर धनंजय जाडे यांनी ’रंजल्या गांजल्याची सावित्री आई होती ’ हे गीत सादर केले. यावेळी महिला शिक्षण दिनानिमित्त विद्यालयातील सर्व महिला शिक्षिकांचा ग्रंथ आणि गुलाबपुष्प देऊन विद्यालयातर्फे गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक जमिला शेख यांनी केले.

प्रमुख मार्गदर्शक शुभांगी कुलकर्णी म्हणाल्या की आजची स्त्री सावित्रीबाई यांच्या कार्यामुळेच यश मिळवत आहे. यावेळी त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्रावर आधारित स्वलिखीत एकांकीका सादर केली. मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते यांनी मार्गदर्शनात सांगितले की, क्रांतीज्योती सावित्रीमाई आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेऊन प्रत्येकाने कार्य करावे.

सर्व मुली शिक्षणाच्या प्रवाहात येतील आणि टिकून राहतील यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करावेत. अध्यक्षीय समारोपात माधुरी कुलकर्णी यांनी स्त्री शिक्षणाविषयी सावित्रीबाई यांच्या कार्याची माहिती दिली. तसेच त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन चैतन्या वंजारे हिने केले तर आभार गायत्री खोडवे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## प्रभाकरराव धारक यांचे निधन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील झेंडा चैक



भागातील रहिवाशी असलेले जेष्ठ नागरिक असलेले प्रभाकर मल्लिकार्जुन धारक (वय ७० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने दि. १ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर सिंदफणा नदीतिरावर असलेल्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शहरातील विजवितरण कार्यालयात लाईनमेन म्हणुन अनेक वर्षे त्यांनी सेवा केली. त्यामुळे ते सर्वपरिचीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातू असा मोठा परिवार आहे. येथील रामेश्वर, सोमेश्वर, परमेश्वर धारक यांचे ते वडील होत.



झाडे लावा...
झाडे जगवा..



## सावित्रीमाईंच्या मानवतावादी विचारांचा व्हावा जागर : प्रा.परमेश्वर खेत्री

▶ प्रतिनिधी

माजलगाव : सावित्रीमाईंच्या विचारांचा जागर हीच काळाची गरज असल्याचे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील समाजशास्त्राचे प्रा.परमेश्वर खेत्री यांनी केली श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला शिक्षण दिन कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भालचंद्र कराड हे उपस्थित होते. पुढे बोलताना प्रा.परमेश्वर खेत्री म्हणाले की सावित्रीबाई फुले यांचे गुण बालपणापासूनच वाखाणण्यासारखे होते. ज्या काळात मुलींचा जन्म हा अशुभ मानला जात होता त्या काळात प्रवाहाच्या विरोधात जाऊन त्यांनी स्त्री शिक्षणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. महात्मा ज्योतिबा फुले यांना समाजसुधारणाच्या व स्त्री जागरणाच्या कार्यामध्ये खांद्याला खांदा लावून त्या आयुष्यभर कार्य करत राहिल्या. अशा या महान समाजसुधारकाचा जन्म महिला शिक्षक दिन म्हणून महाराष्ट्र महाराष्ट्र शासन साजरा करत आहे हे मोठे भाग्यच आहे. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भालचंद्र कराड यांनी केला. याप्रसंगी ते म्हणाले की त्यांनी शिक्षणाबरोबरच समाजसेवेचे काम केले. त्यावेळी अंतर जातीय विवाहाचे समर्थन करत दुष्काळ पडलेला असतानाही त्यांना सत्यशोधक समाजामार्फत मदत केली. त्या काळी प्लेगचा आजार आला होता या आजारांमध्ये त्यांनी स्वतःचे दत्तक पुत्र यशवंत यांच्या माध्यमातून समाजाची सेवा केली. सावित्रीबाई फुले यांनी ज्योतिबा फुले यांच्या मृत्यूनंतर प्रथा परंपरा व समाजाचा विरोध झुगारून अंतिम विधीचे कार्य एक महिला असूनही पूर्ण करून समाजापुढे एक आदर्श निर्माण करून दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्टाफ अकादमीचे प्रमुख प्रा.जिजाराम बागल यांनी केले. तर आभार प्रा.अभय येवतेकर यांनी मानले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, उपप्राचार्य प्रा.युवराज मुळ्ये, उपप्राचार्य प्रा.संतोष लिंबकर, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचारी कोरोना विषयक सामाजिक नियमांचे पालन करून उपस्थित होते.



## जि.प.कन्या प्रशालेत महिला शिक्षण दिन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त महिला शिक्षण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.सदरील कार्यक्रम साजरा करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, व्याख्यान अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील उपक्रमास विद्यार्थीनींचा उत्तम प्रतिसाद होता.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक शंकर नवगणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून मगरे मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. सदरील कार्यक्रमात योगिता बिडवे, साक्षी घेणे, अंजली यादव, सुमन आगे या विद्यार्थीनीनी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. निबंध स्पर्धेत ऐश्वर्या भुजंगे, अपर्णा शिंदे, सलोनी जमदाडे यांनी बक्षीस मिळवले. शाळेचे शिक्षक बाळासाहेब सोनसळे आणि जी.आर.घाटुळ यांनी ’स्त्री शिक्षणाचे महत्त्व व सावित्रीबाई फुले’ या विषयावर मनोगत व्यक्त केले. विद्यार्थीनींनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी एक पुस्तक वाचण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता कुलकर्णी यांनी केले तर आभार शरद नायबळ यांनी मानले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिनकर वाघमारे, संजय माने, बालासाहेब कांबळे, समुद्रे मॅडम, संगीता शिंदे, गोरख उघडे यांनी परिश्रम घेतले.

## ‘क्रांतीज्योतींचे कार्य देशासाठी प्रेरणादायी’

▶ प्रतिनिधी

माजलगाव : थोर समाजसुधारक स्त्री शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रेरणेने स्त्री शिक्षणाची मशाला देशात पेटविली महिलांना गुलामीच्या जोखडातून बाहेर काढत त्यांना समाजात आपले अधिकार व कर्तृव्य सिध्द करण्याचा अधिकार क्रांतीज्योती सावित्रीमाईंनी शिक्षणाच्या माध्यमातून दिला.

’सूर्य ज्याप्रमाणे आपल्याला प्रकाश देतो व आपल्या जीवनातला अंधकार नष्ट करतो आगदी त्याचप्रमाणे महात्मा जोतिराव फुले सावित्रीमाई फुले यांनी शिक्षण देऊन ज्ञानाचे अमृत देऊन स्त्रीयांच्या जीवनामध्ये प्रकाश टाकला व त्यांच्या जिवनातला अंधकार नष्ट केला. स्त्रीयांना प्रत्येक क्षेत्रात आपले कौशल्य सिध्द



करण्याचा अधिकार मिळुन दिला देशात नाव रोशन करण्याची संधी उपलब्ध करून दिली. मनुवादी व्यवसथेने महिलांचे सर्व अधिकार हिराऊन घेतले होते महिलांना फक्त चूल मुल येईपर्यत मर्यादित ठेवले होते. या गुलामीच्या जोखडातून बाहेर काढून महिलांना सर्व अधिकार, हक्क मिळुन देण्यासाठी महात्मा जोतिराव फुले व सावित्रीमाई फुले यांनी आपले आयुष्य महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी वेचले फुले दाम्पत्यांना हे महान कार्य करत असताना काही निर्बंध लोकांच्या त्रासाला सामोरे जावे लागले परंतु महिलांना शिकवण्याचे कार्य त्यांने जोमाने सुरू ठेवले देशातील तळागाळातील सर्व सामान्य माणसाला शिक्षणाच्या प्रवाहात आनले व मानुस म्हणून त्यांनाही अधिकार आहे.

हे फुले दाम्पत्यांनी सिध्द करून दाखवले महिला आज देशाच्या प्रगतीमध्ये अग्रेसर आहे हे केवळ फुले दाम्पत्यांच्या महान कार्यामुळे सावित्रीमाई फुले यांनी केलेले महान कार्य हे देशाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी आहे त्यांच्या या महान कार्याबद्दल भारतरत्न हा पुरस्कार त्यांचा गौरव म्हणून जंयती निमित्ताने देण्यात यावा असे आवाहन तमाम फुले प्रेमीसह ओबीसी संघटक जिल्हाअध्यक्ष राम कटारे यांनी केले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाने मी पोलीस अधिकारी झाले : निता गायकवाड

▶ प्रतिनिधी

माजलगाव : महिलांना शिक्षणाची दारे उघडून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दिलेल्या अनाकलनीय योगदानेच मी पोलीस अधिकारी झाले. असे मत माजलगाव शहर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक निता गायकवाड यांनी व्यक्त केले आहे. माजलगाव येथील क्रांतीसुर्य सेवाभावी संस्थेच्या वतिने दिनदर्शिकेचे प्रकाशन सोहळा निता गायकवाड यांचे हस्ते दि.३ जानेवारी रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, केसापुरी वसाहत येथे संपन्न



झाला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.संजय बागुल हे होते तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन के.व्ही.साळवे, लिलाताई उजगरे, अशोक मगर, अलका उजगरे, भारत टाकणखार, अभिमन्यू इबिते उपस्थित होते. पुढे बोलताना निता गायकवाड म्हणाल्या, माझ्यासारख्या अशा अनेक महिला आहेत. त्यांनी उच्चपदे भुषविले आहेत.त्यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाचे कौतुक करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या संस्थेच्या वतिने अखंडीत ऑनलाईन ३५ व्याख्यानाचे आयोजन केले, त्यामुळे या संस्थेचे पुढील कालावधीमध्ये चांगले कार्य असेल. यासाठी आपण सर्वांनी होईल ती मदत करावी. असे आवाहन क्रांती सुर्य सेवाभावी संस्थे कडून करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन दिनेश निसर्गध यांनी केले. तर आभार बळिराम माने यांनी मानले. या कार्यक्रमास संस्थेचे शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, स्वप्निल स्वामी, प्रवीण वाव्हळ, सदानंद प्रधान, केतन प्रधान, सचिन मगर, आदिनाथ लोखंडे, अभिजित साळवे, राहुल धाईजे, कपिल भाग्यवंत, राहुल वाघमारे, प्रदिप शिंदे, बाळू गायसमुद्रे, रविकिरण टाकणखार, सिद्धार्थ साळवे आदींनी परिश्रम घेतले.



## नगराध्यक्ष शेख मंजूर यांचा सत्कार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : नूतन नगराध्यक्ष नाकलगावचे भूमिपुत्र शेख मंजूर यांचा नाकलगाव ग्रामस्थांच्या वतीने गुरूवारी गोदावरी दुधना महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष शेख मंजूर म्हणाले की, येत्या वर्षभरात माजलगाव शहराचा चेहरा मोहरा बदलणार आहे. शहरात १० कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना तयार करण्यात येणार आहे. यावेळी कमलाकर झोडगे, पत्रकार सुभाष नाकलगावकर, काशिनाथ शिनगारे, नामदेव रत्नपारखे, हनुमान गवळी, बालासाहेब झोडगे, अरुण सोळंके, लिंबाजी गायकवाड, संजय नाकलगावकर, मारोती विटेकर, शिवाजी शेळके, अशोक सोळंके, बालासाहेब शिनगारे, प्रा.संजय झोडगे यांची उपस्थिती होती.

# सभापती 'आबुज' यांच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे 'कल्याण'

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणाला हातभार;पंचवीस हजाराची मदत मिळणार

▶ प्रतिनिधी

बीड : मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घेतला आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरलेल्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ हजार रुपयांची सानुग्रह मदत देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समाजकल्याण समितीचे सभापती कल्याण आबुज यांनी दिली.

दलित वस्तीमध्ये विकास नाल्या, रस्ते, पथदिवे, मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेळ्यांचे विहीरी, घरकुल अशा योजना राबविणाऱ्या जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने आता या निमित्ताने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्न निधीतून समितीला मिळणाऱ्या २० टक्के अनुदानातून ही मदत दिली जाणार आहे. यासह वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट व अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या जेईई या प्रवेशपूर्व



सामाईक परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना एनसीईआरटीचे पुस्तकेही मोफत देण्यास सुरुवात झाली आहे. किमान एक हजार विद्यार्थ्यांना ही पुस्तके दिली जाणार आहेत. सभापती कल्याण आबुज यांनी विविध विकास योजनांसह समाजाच्या शैक्षणिक प्रगतीस हातभार लावता यावा यासाठी वरील दोन योजना नव्याने हाती घेतल्या आहेत. नुकतेच वैद्यकीय प्रवेश होत आहेत. मागासवर्गीय समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील एमबीबीएस प्रवेशापात्र विद्यार्थ्यांना आता समाज कल्याण समितीमार्फत २५ हजारांची मदत दिली जाणार आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय समाजाच्या शैक्षणिक प्रगतीस मदत होईल. गरिब विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाला यामुळे मोठा हातभार लागणार आहे, असे सभापती कल्याण आबुज यांनी सांगितले.

# 'सावित्रीबाई फुले यांच्यामुळे स्त्रियांना स्वाभिमान'

▶ प्रतिनिधी

माजलगाव : क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक विषमतेच्या विरोधात उभे राहून स्त्रीयांना शिक्षणाची दारे खुली करून दिली. त्यांच्या या कार्यामुळेच आज स्त्रिया ह्या विविध क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करत असून सावित्रीबाई फुलेमुळेच स्त्रिया स्वाभिमानाने जगत आहेत असे प्रतिपादन डॉ.स्मिता रुद्रवार यांनी सुंदरराव सोळंके महाविद्यालययात बोलताना व्यक्त केले.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टडी सेंटरच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णाभाऊ वगरे होते तर प्रमुख व्याख्यात्या म्हणून डॉ.स्मिता गजानन रुद्रवार होत्या. यावेळी प्राचार्य डॉ.व्ही.पी.पवार, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. 'स्त्री शिक्षण व सद्यस्थिती' या विषयी पुढे बोलताना डॉ.स्मिता रुद्रवार म्हणाल्या की, माणसाच्या परिवर्तनाचे साधन शिक्षण आहे. सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना स्वाभिमानी केले असे सांगून पुरुषांनी स्त्रियांना विचारांचे स्वातंत्र्य द्यावे असे आवाहन केले. यावेळी प्राचार्य डॉ.व्ही.पी. पवार यांच्यासह प्रा.संजय बागुल प्रा.वैशाली शहाणे, अरुणा स्वामी, प्रा.वडमारे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आरती वाघमारे या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर तयार केलेल्या भीती पत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्टडी सेंटरचे समन्वयक सुदर्शन स्वामी, डॉ.गणेश मोकासरे, प्रा.डॉ.अर्चना कचरे, प्रा.वच्छला भिसे, प्रा.व्हीआर.पुरी, मीना डक, जी.एस.मुसळे, एस.आर.शेख यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना कचरे यांनी केले तर आभार प्रा. वैशाली शहाणे यांनी मानले कार्यक्रमाला विद्यार्थी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.



# शौर्यदिनानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप

## बाबरी मुंडे मित्र मंडळाचा उपक्रम

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील अशोकनगर येथे भिमाकोरेगाव शौर्य दिनानिमित्त बाबरी मुंडे मित्र मंडळाच्या वतीने विवेक जाधव यांनी ५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप दि.१ जानेवारी रोजी करत सामाजिक उपक्रम राबविला.

भिमाकोरेगाव शौर्यदिनानिमित्त सकाळी ठिक १० वाजता शहरातील सम्राट अशोकनगर येथे सार्वजनिक मानवंदना घेण्यात आली. अशोकनगर भागातील होतकरून शालेय विद्यार्थ्यांना पेन, रजिस्टर असे शैक्षणिक साहित्य ५० विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी बाबरी शेठ मित्र मंडळाचे विवेक जाधव, अक्षय कसबे, आकाश उखाडे, विराज आठवे, नितीन गायकवाड, रोहित पवार, विकास सिरसट यांची उपस्थिती होती.

### तेली सामाजासाठी स्वतंत्र सभागृह उभारा : किशोर कानडे

▶ प्रतिनिधी



माजलगाव : विधानसभा मतदारसंघांचे आमदार प्रकाश सोळंके यांना तेली समाजाने निवडणुकीत मतदानरूपी आशीर्वाद दिला. त्याची परतफेड म्हणून आमदार सोळंके यांनी समाज मंदिराचा प्रश्न मार्गी लावावा असे मागणी सामाजिक कार्यकर्ते किशोर कानडे यांनी केली आहे.

निवेदनात किशोर कानडे यांनी म्हटले आहे. माजलगाव तालुक्यात मोठ्या संख्येने तेली समाज आहे. निवडणुकीत या समाजाने आमदार प्रकाश सोळंके यांना मोठा पाठिंबा देऊन मतदानरूपी आशीर्वाद दिला. आता त्याची परतफेड म्हणून सामाज मंदीर आणि सभागृहाचा प्रश्न मार्गी लावावा जेणेकरुन समाजाचे विविध कार्यक्रम घेणे सोपे जाईल आमदार सोळंके आणि नगराध्यक्ष मंजूर शेख यांनी तात्काळ हा प्रश्न निकाली लावावा, असे आवाहन कानडे यांनी केले आहे.

# बालविवाहापासून मुलींना दूर ठेवणे हीच आजची गरज : अर्चना भाले

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माई सावित्रीबाई फुले यांनी मुलींना आत्मनिर्भर करण्यासाठी १८४८ साली प्रतिकुलतेत पाऊल उचलले. आजही खुपसाऱ्या मुलींचे बालविवाह होतात. महिला शिक्षण दिन साजरा करताना आपल्या आसपासचे मुलीचे बालविवाह थांबवण्यासाठी पुढे येणे हीच आजची गरज आहे.असे विचार महात्मा ज्योताबा फुले माजलगाव येथील क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंतीउत्सवात बोलताना अर्चना भाले यांनी व्यक्त केले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप भिलेगावकर हे तर मनिषा पाटील, प्रभाकर साळेगावकर, व्ही.एन.कुलकर्णी, सुमंत गायकवाड, संतोष जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रतिमा पूजनानंतर उर्मिला झांबरे यांनी



सावित्रीगीत सादर केले. सर्व शिक्षिकांचा पेन भेट देवुन सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतात मनिषा पाटील म्हणाल्या, महिला सक्षमीकरणासाठी आपण शिक्षीका भगिनीनी पुढाकार घेणे महत्वाचे. आपणच आपणास कमकुवत समजु नये. समानतेत पुरूषाची पाठराखण करणं, आपल्या कार्यात पुरूषांना प्रेरक बनवणे हाच आपण क्रांतीज्योती सावित्रीबाई यांच्याकडून वसा घेणे व पुढल्या पिढीला देणे.

यावेळी प्रभाकर साळेगावकर यांचेही समयोचित मार्गदर्शन झाले. अध्यक्षीय समारोप करताना प्रदीप भिलेगावकर म्हणाले, ज्ञान गंगोत्री दारी घेवुन येणाऱ्या वंदनिय माई सावित्रीबाई फुले यांचे कृती युक्त जगणे सदैव प्रेरणादायीच आहे. यावेळी सर्व शिक्षकवृंद आणि बार्टीचे समतादूत तुकाराम शेवाळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन, संयोजन, आभार प्रदर्शन, नेटके पणाने प्रविण काळे यांनी केले.



# गुरूकृपा महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील मालीपारगाव स्थित गुरूकृपा औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करताना प्राचार्य डॉ.नरेंद्र चंद्रा, अमित बिंदू, ज्ञानेश्वर शिंदे, प्रणव पाऊले, रमन बनगे, योद्धा सामाजिक युवा मंचचे अध्यक्ष प्रदिप तांबे, वर्तमान माध्यम समुहाचे संपादक भगीरथ तोडकरी.

# माजलगाव पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

## आमदार रोहित पवारांच्या उपस्थितीत होणार पुरस्कार वितरण

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव पत्रकार संघातर्फे दरवर्षी देण्यात येणारा दर्पण पुरस्कार यावर्षी माजलगावचे पत्रकार तुकाराम येवले यांना जाहीर करण्यात आला आहे. यावर्षी पत्रकार संघातर्फे कोरोनाकाळात आरोग्य सेवा देत गोरगरिबांप्रती निःस्वार्थ सामाजिक दायित्व निभावणाऱ्या व्यक्तींचाही 'कोरोना योद्धा' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा आमदार रोहित पवार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

माजलगाव शहरातील राजस्थानी मंगल कार्यालयात १६ जानेवारी रोजी या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. मराठी पत्रकार परिषद मुंबई संलग्न माजलगाव





तालुका पत्रकार संघाच्या वतीने दर्पणदिनाचे औचित्य साधून दरवर्षी दर्पण, समाजभूषण पुरस्कार देण्यात येतात. यावर्षी दर्पण पुरस्कारासह कोरोना योद्ध्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. शनिवारी होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यास आमदार प्रकाश सोळंके, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, नगराध्यक्ष शेख मंजूर, पत्रकार भागवत तावरे, माजी आमदार मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, मोहन जगताप, रमेश आडसकर उपस्थित राहणार आहेत. कोविड योद्धा पुरस्कार डॉ.सुरेश साबळे, डॉ.अनिल परदेशी, डॉ.यशवंत राजेभोसले, डॉ.गजानन रुद्रवार, डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.स्नेहल जाधव, डॉ.पूजा देशमुख,

टेंबे गणेश मंडळ युवा ग्रुप, राजेश्री, राजेंद्र आनंदगावकर व मंजरथ ग्रामस्थ, सुरेंद्र रेदासनी, रियाज काझी, शेख बाबा, एकनाथ मस्के, शाम देशमुख, अझहर नाईक, नितीन क्षीरसागर यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पत्रकार संघाचे अध्यक्ष हरिश यादव, सचिव रत्नाकर कुलथे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष नाकलगावकर व सर्व सदस्यांतर्फे करण्यात आले आहे.




# गरीब रुग्णांना मदत मिळत नाही हे दुर्दैव : आ.पडळकर

▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : देवेंद्र फडणवीस सरकारच्या काळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाने लाखो गरीब रुग्णांना मदत करुन अनेकांना जीवनदान दिले. मात्र या सरकारने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष बंद केल्यामुळे गरीब रुग्णांना मदत मिळत नाही हे दुर्दैव असल्याचे प्रतिपादन आ.गोपीचंद पडळकर यांनी केले.

अल्पावधीतच अभ्यासू व रोखठोक आमदार म्हणून लोकप्रिय झालेल्या गोपीचंद पडळकर हे दिंद्रुड येथे आले असता यावेळी छोटेखानी झालेल्या कार्यक्रमात पडळकर बोलत होते. सभापती कल्याण आबुज, उद्योजक माधवराव निर्मळ, राजेभाऊ निर्मळ, माऊली हरणावळ, दिलीपराव मोटे आदी मान्यवर उपस्थित होते. बंडू खांडेकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.यावेळी महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान, सरपंच भगवान कांदे, विलास शेंडगे, बद्रीनाथ व्हरकटे, उत्तरेश्वर खताळ, कुस्तीगीर परिषदेचे मुरलीधर मुंडे, मारोती दूनगे, महादेव कुंडकर आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागेश ठोंबरे, नागेश कानडे, धनंजय कटारे आदि उपस्थित होते.

वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय,23, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022, **सल्लागार संपादक : चंद्रकांत शेजुळ**